Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 02 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०२ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

सातारा इथं ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील समारंभाला उपस्थित राहतील.

****

राज्यात नैसर्गिक शेतीमध्ये क्रांती आणण्यासाठी कृषि विद्यापीठांनी योगदान द्यावं, असं आवाहन राज्यपाल आणि कुलपती आचार्य देवव्रत यांनी केलं. कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसंच राज्यातल्या कृषि आणि पशु विज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरूंशी त्यांनी दूरस्थ माध्यमातून संवाद साधला. जागतिक हवामानाचं गंभीर संकट लक्षात घेऊन राज्यातल्या कृषि विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाणांना संस्कारित करून त्यांचं जतन संवर्धन करावं आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल अशा प्रकारचं बियाणं निर्माण करावं असं ते म्हणाले.

राज्यपालांनी काल नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुक्यातल्या पिंपरखेड इथल्या ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना वृक्षारोपण, स्वच्छता, नैसर्गिक शेती, गोपालनाचं महत्त्व सांगितलं. एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत त्यांनी पिंपरखेड इथल्या महाविद्यालयात वृक्षारोपण केलं. त्र्यंबकेश्वर इथल्या हिवाळी पाड्यावरील जिल्हा परीषदेच्या शाळेचं राज्यपालांनी कौतुक केलं. या शाळेतले विद्यार्थी दोन्ही हातांनी लिहू शकतात, याबरोबरच भारतीय राज्य घटनेतील कलमे तसंच एक हजार संख्येपर्यंतचे पाढे म्हणतात.

****

घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत कोणतीही वाढ झालेली नाही, असा स्पष्ट खुलासा केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं केला आहे. काही प्रसारमाध्यमांमध्ये व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतीत १११ रुपयांची वाढ झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर मंत्रालयानं हे स्पष्टीकरण दिलं. मंत्रालयानुसार, व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचे दर बाजार-निर्धारित असून ते आंतरराष्ट्रीय मापदंडांवर आधारित असतात. मात्र, घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. घरगुती ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

****

सार्वजनिक सुविधा वाढवण्यासाठी आणि महामार्ग वापरकर्त्यांना होणारा त्रास कमी करण्याच्या उद्देशानं भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं मोठा आणि दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार एक फेब्रुवारी २०२६ पासून कार, जीप आणि व्हॅन या श्रेणीतील वाहनांसाठी नवीन FASTag जारी करताना केवायसी प्रक्रिया बंद करण्यात येणार आहे. आतापर्यंत वैध वाहन कागदपत्रं असूनही, केवायसी नंतरच्या अतिरिक्त अटींमुळे FASTag सक्रिय होण्यास विलंब होत होता आणि वाहनचालकांना गैरसोय सहन करावी लागत होती. नव्या सुधारणेमुळे अशा अडचणी दूर होऊन महामार्ग प्रवास अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे.

****

पणन हंगाम २०२५–२६ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान आणि भरडधान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागानं ही माहिती दिली. यापूर्वी शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ होती. मात्र लोकप्रतिनिधी आणि विविध स्तरांवरून करण्यात आलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर शासनानं हा निर्णय घेतला.

****

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसचं उद्दिष्ट मुंबईला भ्रष्टाचारमुक्त करून पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन देण्याचं आहे, असं मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी सांगितलं. त्या काल मुंबईत माध्यमांशी बोलत होत्या. सत्ताधारी महायुतीने गेली अनेक वर्षं मुंबई महापालिकेच्या प्रशासनात राहून मुंबईकरांच्या हक्कांचं दमन केलं असून, त्यांच्या पैशाची लूट केल्याचा आरोपही गायकवाड यांनी केला. महायुतीने २०२२ पासून प्रशासकाची नेमणूक करून महापालिकेच्या मुदत ठेवीतले १२ हजार कोटी रुपये लाटल्याचा आरोपही त्यांनी केला.

****

गडचिरोली जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांच्या पुढाकारातून नक्षलपीडित कुटुंबातल्या २९ तरुणांना शासनसेवेत सामावून घेत त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत शिपाई पदावर नियुक्ती केली आहे. काल या नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यात आलं.

****

उत्तर भारतात थंडीची तीव्रता वाढत असून, हवामान विभागानं दिल्ली, पंजाब, हरियाणा, चंदीगड, ओडिशा आणि राजस्थानसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये हिमवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला असून, डोंगराळ भागांत थंडी अधिक वाढण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशाच्या उंच भागांत हलकी हिमवृष्टी झाली असून, पुढील २४ तासांत पुन्हा हिमवृष्टी आणि पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

दरम्यान, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्य भारतात दाट धुक्याचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे वाहतूक आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे, तमिळनाडू, पुदुचेरी आणि कराईकालमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी हवामान खात्याच्या सूचनांचं पालन करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****